# प्रकरण २ रे

## संबधित साहित्याचा आभ्यास

२.१ प्रस्तावना

२.२ संबधित साहित्याचा आभ्यास

२.३ समारोप

# प्रकरण २ रे संबधित साहित्याचा आभ्यास

## २.१ प्रस्तावना

संबधित साहितयाचा आभ्यास केल्यामुळे आपण जे संशोधन करणार आहोत. तेच संशोधन पूर्वी झाले काय? हे समजते व झाले असल्यास त्याची पुनरावृत्ती टाळता येते. भा.गो.बापट यांनी आपल्या शैक्षणिक संशोधन या ग्रंथात म्हटलेले आहे. "संदर्भ संशोधनाच्या अभ्यासाने संशोधकास पूर्वीच्या संशोधनाचे स्वरूप समजते. जुन्याचीच पुनरावृत्ती केंव्हाच मान्य केली जात नाही."[१] संशोधकाला या संबधित संशोधनापासून संशोधनाची दिशा, कार्यपध्दती या विषयी मार्गदर्शन होते.

पूर्व संशोधनाच्या आभ्यासाच्यावेळी पूर्वीच्या संशोधकाने प्रतिसादकांची निवड करताना काय काळजी घेतली व कोणते धोरण स्वीकारले याचा अभ्यास उपयुक्त ठरतो. पूर्वीच्या संशोधकाने या सारखाच प्रश्न कसा हाताळला आहे हे समजते, समस्या कशी सोडवावी कोणत्या पध्दती व तंत्रे वापरावीत याची सुचना मिळते.

संशोधनाची योजना आखताना संशोधनात जमविलेल्या माहितीचा अर्थ लावताना आणि अनुमान किंवा निष्कर्ष सांगताना संशोधकाच्या अनुभवाचा, ज्ञानाचा लाभ घेता आला पाहिजे आणि यासाठी संशोधकाचे इतर अधिकारी व्यक्तिच्या पुस्काच्या अभ्यासातून काढलेली टिपणे आणि पूर्वीच्या संशोधनातून घेतलेले मार्गदर्शन यांच्या सारखीच स्वानुभवाची नोंद करणे आवश्यक ठरते.

संदर्भ साहित्याच्या आढयावयामुळे संशोधकास आपल्या विषयातील नाविन्य काय आहे ते मांडता येते. पूर्वीच्या संशोधनाचा उपयोग पायाभूत मानता

---

१) बापट भा.गो. - शैक्षणिक संशोधन" (१९७७)
(नूतन प्रकाशन २१८१, सदाशिव पेठ, टिळक पथ पुणे -३०) पृष्ठ संख्या ६४.

येतो. वेळ, श्रम आणि पैसा यांचा योग्य त-हेने वापर करता येतो.

बेस्ट आणि कहन यांनी आपल्या रिसर्च 'इन एज्युकेशन' या ग्रंथात म्हटले आहे, "मान्यवर लेखकाच्या लिखाणाचा गोषवारा आणि आणि पूर्व संशोधनातून हे सिध्द होते की, संशोधकास जे ज्ञान आहे त्याच्याशीही तो परिचित आहे किंवा जे अदयाप ज्ञात नाही आणि ज्याची चाचणी घेतली नाही. त्याच्याशीही तो परिचित आहे. प्रभावी संशोधन हे पूर्व ज्ञानावर आधारित असल्यामुळे ही पायरी पूर्वी जे केलेले आहे. त्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मदत करते आणि अर्थपूर्ण संशोधन करण्यासाठी सहायक सूचना, परिकल्पना पुरविते."

" A summary of the writings of recognized authorities and of previous research provides evidence that the researcher is familiar with what is already known and what still unknown and untested since effective research is based upon past knowledge this step helps to eliminate the depletion of what has been done and provides useful hypotheses and helpful suggestion's for significant investigations."[2]

"संदर्भ ग्रंथ ज्ञानकोष, शब्दकोष, हस्तपुस्तके, व वार्षिक, निर्देशसूची गोषवारा व नियतकालिके, शैक्षणिक संशोधन, अप्रकाशित साहित्य, संशोधन प्रतिवृत्ते या सर्वांमुळे उपयुक्त माहिती व कौशल्य प्राप्त होते. म्हणून संशोधकाने संबधित साहित्याचा अभ्यास केला आहे.

## २.२ संबधित साहित्याचा अभ्यास

संबधित संशोधकाचे क्षेत्र कोणते, साधने कोणती वापरली होती. माहिती व तिचे विषदीकरण निष्कर्ष व सूचना कोणत्या केल्या आहेत यांची दखल

2. John V. Best, "James V. Kahn" Research in Education (New Delhi Prentice Hall of India pul 1985 Limited.) Page No. 40

घेवूनच त्याच गोष्टीची पुनरावृत्ती न होईल या विचाराने आपला विषय व संशोधन कार्यक्रम इत्यादी गोष्टीची निश्चती करावयाची असते. त्यासाठी पूर्वीच्या संशोधकाच्या अहवालातील आवश्यक बाबी संशोधकाने आपल्या अहवालात सादर करणे जरुरीचे असते. अशा समीक्षणामुळे संशोधकास आपल्या विषयातील नाविण्य काय आहे. ते मांडता येते तसेच पूर्वीच्या संशोधनाचा उपयोग पायाभूत मानता येतो. संशोधकाने प्रस्तुत समस्येबाबतच्या संबधित संशोधनाचा अभ्यास करुन त्याचा घोषवारा पुढील प्रमाणे दिलेला आहे.

## २.२.१ प्रा.भा.गो.बापट

"An Investigation in to the condition of pre - primary education in the poona university area with a view to finding out its problems and suggesting out its problems and suggesting sofwtions of come of them"[3]

(Ph.D. Education poona University 1956)

संशोधकाने निवड केलेल्या विषयाच्या समस्येवसंबधी प्रा.भा.गो.बापट यांनी अशा प्रकारची समस्या घेवून त्यांनी पी.एच.डी. साठी हा प्रबंध पुणे विद्यापीठास सादर केला आहे. या संशोधनाच्या प्रमुख हेतू पुढील प्रमाणे आहे. पूर्वप्राथमिक शाळांची सदस्थिती. त्यांची पध्दती शिक्षक व त्यांना प्रशिक्षण देणा-या संख्याचा अभ्यास करुन यामधील विविध स्तरावरील अडचणी ओळखणे व त्यापैकी काहीवर उपाय सुचविणे.

या संशोधनासाठी पुढील साधनाचा वापर करुन माहिती गोळा करण्यात आली आहे.

---

3] Buch M.S. - "A Survey of Research in Education" ( Centre of Advanced Study in Education, Faculty of Education and Psychology M.S. University of Baroda. First Edition March 1974 ) PP 480 - 82.

१) प्रश्नावली

२) प्रत्यक्ष संस्थाना भेटी

३) संस्थाप्रमुख, शिक्षक व पालक यांच्याशी चर्चा

४) प्रमुख सामाजिक कार्यकर्त्यांच्या मुलाखती

५) कार्यालयीन अहवाल - पुस्तके व नियतकालीके

या संशोधनासाठी गोळा केलेल्या माहितीच्या पृथक्ककरणासाठी शेकडेवारी या शेकडेवारी या संख्याशास्त्रीय मापनाचा वापर करण्यात आला आहे.

या संशोधनात पूर्वप्राथमिक शिक्षण संस्थाच्या समस्या समस्याच्याबातीत खालील संदर्भात चर्चा केली आहे.

१) पूर्व प्राथमिक शिक्षणाची तत्वे

२) संस्था प्रमुखाची व शिक्षकाची पात्रता

३) पूर्व प्राथमिक शिक्षणावरील नियंत्रणा

४) पूर्वप्राथमिक शिक्षण संस्थाचा परिसर, शिक्षण, संस्थामधील विद्यार्थी संख्या आणि शैक्षणिक साधने

५) कामाचे तास, कामाचे दिवस, सुट्टया, नोंदी, कामाची पध्दती, अध्यापन पध्दती, मान्यता व तपासणी

६) शिक्षक - पालक - संघ

७) पूर्वप्राथमिक शाळांचे प्राथमिक शाळेत रुपांतर

८) शासकीय धोरण व स्थिती

९) वित्तपुरवठा

१०) पूर्वप्राथमिक शिक्षणाचा विस्तार.

या संशोधनामध्ये (अंगणवाडी) पूर्वप्राथमिक शाळांमधील मुलांच्या पालकांच्या सर्वेक्षणामध्ये खालील अडचणी दिसुन आल्या आहेत.

१) पुर्वी प्राथमिक शाळामधील विद्यार्थी संख्या शैक्षणिक, साहित्यीक व कार्यपध्दती.

२) पूर्व प्राथमिक शिक्षकांविषयी पालकांचा दृष्टीकोन.

३) फी व शाळांचा वित्त पुरवठा.

४) सरकारची जबावदारी.

५) शिक्षक पालक संघाची स्थापना

या संशोधनामध्ये खालीलप्रमाणे प्रमुख अडचणी शोधून काढल्या गेल्या आहेत.

१) पूर्व प्राथमिक शिक्षणाचे तत्वज्ञान.

२) विद्यार्थी संख्या व जागा.ट

३) गट करण्याची पध्दती, सामाजिकरण, क्रिडा, विविध व्यवसाय साधने.

४) वैद्यकीय तपासणी व अन्न पुरवठा

५) पूर्व प्राथमिक शिक्षणावरील खर्च व त्यावरील नियंत्रण.

६) पालकांचे सहकार्य.

७) शिक्षक - पालक संबध.

८) पूर्व प्राथमिक शिक्षकांचे प्रशिक्षण .

## २.२.२ *बृहन्मुंबईतील मॉंटेसरी शाळा*

" A Survey of the montessori Classes in Bombay – Bombay University – 1970."[4]

4| Ibid P - 571

St. Xavier's Institute of Education या संस्थेने बृहन्मुंबईतीतल मॉंटेसरी शाळांचे सर्वेक्षण १९७० मध्ये केले आहे. या सर्वेक्षणाचा प्रमुख हेतु असा होता. ही मॉंटेसरी चळवळीचा पूर्व प्राथमिक शिक्षण क्षेत्रात किती प्रमाणात परीणाम झाला आहे व मॉंटेसरी शिक्षणाची लोकप्रियता आजमाविणे असा होता. यासाठी या संस्थेने बृहन्मुंबईतील एकूण ४९ मॉंटेसरी शाळांना भेटी दिल्या होत्या. यासाठी याशाळांची माहिती गोळा करण्यासाठी जो तक्ता तयार केला होता त्या तक्त्यात शाळांची स्थापना, शिक्षणाचे माध्यम विद्यार्थी संख्या, शिक्षकांचे प्रशिक्षणक व शैक्षणिक साहित्य इत्यादी बाबींचा समावेश केला होता.

शाळांची स्थापना या संबधी सर्वेक्षणामधून मिळालेल्या माहितीवरुन एकूण ४९ शाळांपैकी एक शाळा १९०५ मध्ये स्थापन झाली आहे. दोन शाळा १९६९ मध्ये स्थापन झाल्या आहेत. बहुतांशी शाळा (४६) १९६९ नंतर स्थापन झालेल्या आहेत. बहुतेक शाळांमधून इंग्रजी हेच अध्यापनाचे माध्यम आहे. ब-याच कमी शाळांमधून मराठी व गुजराती भाषेमधून शिक्षण दिले जाते. एकूण विद्यार्थी संख्या ५३३९ आहे. याशाळांमध्ये २४० शिक्षिका व ६४ मदतनिस म्हणून काम करतात. २४० शिक्षिकांपैकी १५० शिक्षिका या मॉंटेसरी पध्दतीचे प्रशिक्षण घेतलेल्या आहेत.

बृहन्मुंबईतील या ४९ शाळांपैकी ३७ शाळामध्ये मॉंटेसरी पध्दतीचे मूळ स्वरुपातील साहित्य वापरले जाते. १२ शाळांमध्ये सुधारित स्वरुपाची साधने वापरली जातात या शाळांची सर्वात मोठी अडचण म्हणजे प्रशिक्षित शिक्षिका मिळत नाहीत. त्यामुळे शिक्षक - विद्यार्थी यांचे प्रमाण असामधानकारक आहे. तसेच पालकांना या शिक्षणाविषयी ज्ञान नाही यामुळे पालकही या शिक्षणाबाबत उदासिन आहेत असे आढळून आले आहे.

या सर्वेक्षणात विद्यार्थ्यांच्या आरोग्याविषयी मधल्या सुट्टीतील जेवण शिक्षकांच्या समस्या, पालक शिक्षक संघाची भूमिका तसेच फी यासंबधी

माहिती मिळवण्यात आली नाही. त्यामुळे संशोधकांचे आपल्या संशोधनात यासंबधी माहिती मिळविण्यात आली आहे.

### 2.2.3 Prof. pisharody S.B.

"A critical History and Interpretation of the Educational concept's and Mathodalogy of the montessori system of Educetion at the pre. school stage."[5] Ph.D. Edu. APSU - 1972.

Prof. Pisharody S.B. यांना अशा प्रकारची समस्या घवून पी.एच.डी. साठी हा प्रबंध १९७२ मध्ये Akadesh Pratap Singh University या विद्यापीठास सादर केला आहे.

> या संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे

१) शिक्षण तत्वेत्ते व विचारवंत यांच्या मते १७ ते १९ व्या शतकात माँटेसरी शिक्षण पध्दतीची संकल्पना आणि पध्दती कशी विकसीत होत गेली आहे याचे ज्ञान करून घेणे.

२) माँटेसरी शिक्षणाची संकल्पना आणि पध्दतीचा प्रत्यक्ष वर्गामध्ये उपयोग करण्यासंबंधी भारत आणि संयुक्त संस्थानेतील प्रयोग पध्दतीचे विश्लेषण करणे.

३) माँटेसरी पध्दतीचा प्रभाव वर्ग चाचण्यांच्या माध्यमातून तपासून पाहणे.

> या अभ्यासाची कार्यपध्दती :-

वर्गातील प्रयोग वाङःमयातून शोध चर्चा आणि भागीदार निरीक्षण ही माहिती गोळा करण्याची प्रमुरव साधने होती. पारंपारिक माँटेसरी पध्दती

5| Buch M.B. "Second Survey of Research in Education" (Baroda Society for Educational Research and Development - 1979) P. 58

कार्यन्वित करण्यासाठी भागीदार निरिक्षणाचा उपयोग करण्यात आला. त्यासाठी भारतात आणि संयुक्त संस्थान येथे एक एक संस्था सुरु करण्यात आली.

माँटेसरी पध्दतीचा सहभाग हा मुलांच्या मनाची घडण आणि संवेदनशील काळाची वाढ करणे हे प्रमुख तत्व आहे. वातावरण निर्मित आणि व्यवसायनिर्मित एकूण दिलेली सर्व कार्ये मुलांच्या संवेदनशील काळाशी अधुकपणे जुळलेले दिसून आले. वातावरण निर्मित कार्यक्रम प्रमाण गुणांच्या माध्यमातून सारख्या प्रमाणात तपासण्यात आले. माँटेसरीच्या सर्व मुलांच्या बाबतीत आत्मनिरीक्षण पध्दती निश्चित करण्यात आली. माँटेसरी पध्दतीत मुलांची बुध्दिमत्ता , धारणा संवेदने आणि संवेदनशिलता यांचा विकास तीन अवस्थामधून करून घेण्यात आला. स्नायूंच्या परस्परानुकूल संपादनातून मुलांना जागृत करण्यात आले. उदा. भावना, मोजमाप, आकार, रंग, आवाज, गंध, लवचिकता, बाह्यकणकरपण आणि उपदेशात्मक साहित्यातून माँटेसरीच्या कल्पनांना आणि तत्वांना महत्व प्रामुख्याने पिपनेट (Piaget) ब्रुनर (Bruner) आणि बार्नर (Warner) यांच्या सिध्दांतातून बळकटी देण्यात आली.

भारतातील मोठया शहरांतील माँटेसरी आणि फ्रोबेल पध्दतीच्या बहुसंख्य शाळा या खाजगी संस्थाकडून चालविल्या जातात असे दिसून आले. वाढती गुंतागुंतीची संस्कृती बदलती कुटुंब पध्दती, मानसिक दुर्बलता यांचा परिणाम मुलांवर झालेला दिसून आला. मुलांना त्यांच्या गैरवर्तनामुळेच शाळेतून तीन ते चार आठवडयाच्या कालावधीनंतर काढून टाकण्यात आले. बदलत्या समाज रचनेच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास मुख्यत्वेकरून वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण, व्यावसायीक पालक या सर्वांचा विचार लक्षात घेता मुलांच्या जीवनाचा समतो विकास होण्यासाठी माँटेसरी शिक्षणप्रणाली जास्त उपयुक्त आहे. या संदर्भात १९६४ - १९६६ च्या भारतीय शिक्षणाची मजबूतपणे अमंलवजावणी करण्यास सुचित केले आहे. माँटेसरीतून आलेला मुलागा ही

संपूर्णपणे येथील तयार केलल्या वातावरणावर अवलंबून असतो. मॉंटेसरीतून आलेला मुलगा हा तार्किक विचाराच्या माध्यमातून अवघड अशा परिस्थितीतून मार्ग काढण्यात समर्थ असतो.

## 2:2:4: Prof. Badami C.R.

"Prof Badami C.R. यांनी "A study of some Aspeet's of motor Development Among pre. school children." [6] प्रकारची समस्या घेवून पी.एच.डी. साठी हा प्रबंध १९७४ मध्ये गुजरात विद्यापीठात सादर केला आहे.

➢ **या संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे**

१) पूर्वप्राथमिक वयोगटातील मुलांचा सामान्य विकासातील कारक वर्तनाचा अभ्यास करणे.

२) मुलांच्या कारक विकासाशी पालक - शिक्षक व इतरांच्या मार्गदर्शनाशी कसा संबंध आहे याचा अभ्यास करणे.

➢ **या अभ्यासाची कार्यपध्दती व साधने :-**

संशोधनासाठी सामान्य वर्णनात्मक पध्दतीचा वापर करण्यात आला त्यासाठी २ ते ५$^{1}/_{2}$ वर्षे वयाची ४० मुले निवडून त्यांचे लैंगिकतेनुसार दोन समान गट पाडण्यात आले. गेसेलच्या विकासात्मक परिशिष्टाद्वारे चलनशील कारक कौशल्ये (Locomotor Skill's ) आणि हस्तकारक कौशल्ये या संबंधी माहिती मिळविण्यात आली. तसेच गुणात्मक आणि परिणाकारक मिळविण्यात आली. तसेच गुणात्मक आणि परिणामकारक माहिती जमा करण्यात आली. मिळालेल्या माहितीचे टी (t) टेस्टच्याद्वारे विश्लेषण करण्यात आले.

---

6] Buch M.B. "Third survey of Research in Education - 1978 - 83." (New Delhi NCERT. 1987) P. 325.

या संशोधनाद्वारे खालील महत्वाच्या गोष्टी शोधून काढल्या.

१) चलनशीलकारक कोशल्य आणि हस्तकारक कौशल्य यांचा अभ्यास यांचा अभ्यास करताना असे दिसून आले की दोन्हीही घटकांचा संपूर्ण कालावधीत स्थिर असा विकास दिसून आला.

२) कौशल्य विकासाच्या गतीत बरीचशी परिवर्तन दिसून आली.

3) कांही वयोगट पातळीवर काही कौशल्यांची गती जलद दिसून आली तर काही कौशल्यांची गती मंद दिसून आली.

४) एकूण बहुतेक क्रिया - प्रतिक्रियामध्ये लैगिंक भिन्नता दिसून आली नाही.

५) कांही विशिष्ट वयोगट पातळीवर काही घटकाच्या बाबतीत लैंगिक भिन्नता विशेष करून दिसून आली तर काही वयगटपातळीवर ती दिसून आली नाही.

६) मुलांच्या विविध क्रिया - प्रतिक्रियांची माहिती' मिळविण्यासाठी परिणामकारक अशा संघटनाचा वापर करण्यात आला.

२:२.५ प्रा. देवी सी.एल.

प्रा. देवी सी.एल. यांनी "An Analytieal Study of sociel Development of Nursery School Children"[7] अशा प्रकारच्या समस्या घेवून पी.एच.डी. साठी हा प्रवंध १९७५ मध्ये केरळा विद्यपीठात सादर केला आहे. या संशोधनाचा प्रमुख हेतु पुढीलप्रमाणे होता. पूर्वप्राथमिक शाळेतील मुलांच्या विकासाच्या विविध पैलुचे विश्लेषण करणे हा होता.

या संशोधनासाठी त्यांनी निर्थक छेद उपगमन पध्दतीचा अवलंब केला आहे. यासाठी त्यांनी त्रिवेद्रम जिल्ह्यातील १२ पूर्वप्राथमिक शाळांमधील 3 - 3

---

7] I biid P - 988.

व ४ - ५ या वयोगटातील २०० विद्यार्थी निवडले होते. सदरहू संशोधनासाठी जे संवर्ग घेण्यात आले होते त्यामध्ये शहरी ग्रामीण भागातील मुलांमुलींचा समावेश होता. मुले व मुली यांची समसमान संख्या वयोगटानुसार घेण्यात आली होती. या विद्यार्थ्यांचे सामाजिक वर्तन हे त्यांच्या शारिरीक, कारक व्यक्तिमत्वाविषयक व बौध्दिक विकासाच्या आणि त्यांच्या मशाळेतील कार्यक्रमातील सहभाग या संदर्भात अभ्यासण्यात आले. यासाठी त्यांनी निरिक्षण तंत्राचा प्रामुख्याने वेळोवेळी वापर केला आहे. तसेच ध्वनीमुद्रकांचाही वापर करण्यात आला होता.

पालकांकडे निरिक्षण नोंदवह्या देऊन त्यांना निरिक्षण करण्यास सांगण्यात आले हो. पालकांच्या नोंदीच्या आधारे शिक्षकांनी पडताळा सुचीच्या साह्याने निरीक्षण केले. या माहितीच्या पुष्ठयार्थ मुलाखत तंत्राचाही वापर करण्यात आला होता. बुध्दिमत्ता मोजण्यासाठी सेग्निन फॉर्म बोर्ड मॅनिकेन कसोटी - जपरटयुअस कूट कसोटयांचाही वापर करण्यात आला होता. सामाजिक वारंवारिता वर्गीकरण करून सामाजिक वर्तनाचे अतिउच्च माध्यम - नीचतम या तीन गटात वर्गीकरण करण्यात आले. दोन वयोगटातील प्रत्येक पेलुच्या संदर्भातील मुल्य प्रत्येक पैलुच्या संदर्भातील फरकाचे मूल्य काढण्यात आले व त्यांचे विश्लेषण करण्यात आले होते.

सामाजिक वर्तनाच्या प्रत्येक क्षेत्रातील विविध हेतू शोधून वैयक्तिक सामाजिक, बौध्दिक, अशा गटात वर्गीकरण करून त्यामध्ये त्यांचे परत अतिउच्च - माध्यम नीचतम अशी मांडणी करण्यात आली.

या संशोधन अभ्यासाचे प्रमुख निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

१) बुध्दतीमत्ता, लिंग, आराग्य घरातील जन्मक्रम व पालकांच्या धर्म यांच्या बालकांच्या धर्म यांच्या बालकाच्या सामाजिक विकासाशी लक्षणीय असा संबध दिसून आला नाही.

२) बालकांच्या सामाजिक विकासाशी पालकांची अनुपस्थिती मात्र लक्षणीयरित्या निगडीत असते असे दिसून आले.

३) पालकांच्या आर्थिक दर्जा, व्यवसाय आणि शिक्षण इत्यादीमुळे बालकांच्यामध्ये उच्च सामाजिक विकास व निचतम सामाजिक विकास असे गट आढळून आले. म्हणजेच या बाबी सामाजिक विकासाशी निगडीत आहेत.

४) शालेय वातावरण व सामाजिक विकास यामधील संबधावर पालकांच्या आर्थिक दर्जाचा परिणाम झालेला दिसून आला.

५) मुलांना मुलींबरोबर खेळावयास आवडते परंतु मुलींना मात्र मुलींबरोबरच खेळावयास आवडते.

६) समाजातील वरच्या दर्जातील लोकांमध्ये शाळेबद्दल अनुकल दृष्टकोन असलेला दिसून आला.

## २:२.६ प्रा. ठक्कार एच.पी.

"प्रा.ठक्कार एच.पी. यांनी "Curriculum in pre - School Education"[8] अशा प्रकारची समस्या घेवून पी.एच.डी. साठी हा प्रबंध १९७९ मध्ये मुंबई विद्यापीठास सादर केला आहे.

या संशोधनाची प्रमुख उद्दीष्टे पुढील प्रमाणे आहेत.

१) पूर्वप्राथमिक शिक्षणाची आवश्यकता शोधणे.

२) सध्याच्या पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या तत्वप्रणाली पध्दती आणि प्रत्यक्ष कार्यवाहीच्या पध्दतीचा अभ्यास करणे.

३) मुंबई शहरातील पूर्वप्राथमिक शिक्षणाचा बोधात्मक जाणीवेपेक्षा संदर्भात सर्वसमावेशक सर्वेक्षण करणे.

8| I bid. P - 988.

४) दृक - अवबोधनाचा केवळ भेदनाच्या दृष्टीनेच नव्हे तर विचार श्रृंखलेच्या अवबोधात्मक प्रतिक्रियामध्ये व भाषिक कौशल्याच्या विकासामध्ये आसणा-या संबधाचा अभ्यास करणे.

संशोधकाने शहरी भागात राहणा-या तीन ते साडेतीन वयोगटातील वेगवेगळया स्तरातील विधार्थ्यांची निवड केली. त्यामध्ये ज्यांचे उत्पन्न दरमहा १००० रुपये किंवा त्यापेक्षा जास्त असेल तो उच्च वर्ग व ज्यांचे उत्पन्न ८०० ते १००० रुपये आहे तो मध्यमवर्ग व ज्यांचे उत्पन्न ४०० ते ५०० पर्यंत आहे तो कनिष्ठ वर्ग. अशा तीन आर्थिक उत्पन्नाच्या गटातील मिळून ५० मुले नियंत्रित गटामध्ये तर ५० मुले प्रयोगगटामध्ये निवडली. या प्रयोगामध्ये प्रायोगिक गटावर दृक - अवबोधन कसोटीचा अध्यापन साधन म्हणून उपयोग करण्यात आला.

## २.२.७. प्रा.राव एस.आर.

प्रा. राव एस.आर. यांनी "A Study of the effects of pre - School Education on primary and secondary Education"[9] अशा प्रकारची समस्या घेवून पी.एच.डी. साठी हा प्रबंध १९८७ मध्ये सादर केला आहे. या संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती.

१) पूर्व प्राथमिक शिक्षणाचा प्राथमिक व माध्यमिक शिक्षणावर कोणता परिणाम होतो हे पाहणे.

२) ज्या विधार्थ्यांनी पूर्वप्राथमिक शिक्षण घेतलेले होते व ज्यांनी हे शिक्षण घेतलेले नव्हते त्यांच्या शालेय गुण संपादनामध्ये तसेच व्यक्तित्वात व सामाजिक विकासाच्या दृष्टीने पडणारा परिणाम अभ्यासणे.

9] I bid. P - 569.

यासाठी संशोधकाने पहिली तिसरी व आठवीतील मिळून ४८० विद्यार्थी संशोधनासाठी निवडले. या विद्यार्थ्यांचे तेलगू, गणित व इंग्रजी या विद्यार्थ्यातील वार्षिक गुण मिळवले. तसेच तेलगु शब्दसंग्रह परिणाम श्रेणी व तेलगू हस्ताक्षर परिमाण श्रेणी व तेलगू हस्ताक्षर परिमाण श्रेणीचा वापर करण्यात आला. संशोधकाने विद्यार्थ्यांचा वैयक्तिक व सामाजिक विकास अजमिविण्यासाठी पदनिश्चय श्रेणी विकसित केली की त्यामुळे विद्यार्थि मिसळण्याची वृत्ती, सहकार्य वृत्ती, नेतृत्वगुण, चित्रकला क्षमता, गोष्टी सांगण्याची क्षमता, आरोग्यविषयक सवयी, स्वतत्रपणे काम करण्याची क्षमता व खेळातील सहभाग या बाबींचे मापन करण्यात आले.

या संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष.

१) ज्या विद्यार्थ्यांनी पूर्वप्राथमिक शिक्षण घेतलेले आहे व ज्यांनी हे शिक्षण घेतलेले नाही. त्यांच्या पहिलीतील तेलगूच्या गुणसंपादनामध्ये फरक आढळून आला. ज्यांनी हे शिक्षण घेतलेले आहे त्यांची पहिलीच्या वर्गातील तेलगू विषयातील प्रगती चांगली होती.

२) इयत्ता तिसरी व आठवीच्या तेलगू हस्ताक्षराच्या बाबतीत मात्र पूर्वप्राथमिक शिक्षण घेतलेले असण्याचा किंवा नसण्याचा संबध दिसून येत नाही.

३) तिसरीच्या वर्गात तेलगू हस्ताक्षरामध्ये पूर्वप्राथमिक शिक्षण घेतलेले असणाचा किंवा नसण्याचा संबध दिसून येत नाही.

४) व्यक्तिगत विकास व सामाजिक विकासाच्या बाबतीत मात्र ज्या विद्यार्थ्यानी पूर्वप्राथमिक शिक्षण घेतलेले आहे असे विद्यार्थी व ज्यांनी हे शिक्षण घेतलेले नाही त्यांच्यापेक्षा सरस आढळून आले. तसेच

चित्रकला, नियमितपणा, खेळातील सहभाग इत्यादी बाबतीत देखील हा फरक दिसून आला.

## २:२.८ प्रा. पटेल एस.एस.

प्रा. पटेल एस.एस. यांनी "An Investigation in to the role of general ablity of preprimary school children in relation to reading readines"[10] अशा प्रकारची समस्या घेवून पी.एच.डी. साठी प्रबंध १९८२ मध्ये सरदार वल्लभाई पटेल विघापीठास सादर केला आहे.

या संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

१) तीन ते सहा या वयोगटातील मुलांची सामान्य क्षमता अजमाविण्यासाठी साधने विकसीत करणे.

२) सामान्य क्षमेतेच्या वाचन तयारीच्या विविध घटकांवर व एकूणच वाचन तयारीवर कोणता परिणाम होतो ते अभ्यासणे.

या अभ्यासासाठी वापरलेली कार्यपध्दती व साधने पुढील प्रमाणे.

मुलांची वाचन तयारी मोजण्यासाठी उमजवाला यांनी विकसित केलेली कसोटी वापरण्यात आली आहे. तसेच सामान्य क्षमता आजमविण्यासाठी एक आशाब्दिक कसोटी तयार करुन ती प्रामाणिक केली होती. यामध्ये प्रमुख दोन भाग होते. त्यापैकी माहितीवर आधारित २० प्रश्न तर तर्कानुमानावर आधारित २४ प्रश्न होते. या कसोटीचे प्रमाण ठरविण्यासाठी गुजरात राज्यातील २१९९ विघार्थ्यांचा प्रतिनिधिक न्यायदर्श घेण्यात आला होता. सामान्य क्षमता व वाचन तयारी यातील संबध शोधण्यासाठी ४०० मुले सप्रयोजन न्यायदर्शन पध्दतीने निवडण्यात आली होती. सहसंबंध गुणक वेगवेगळया पध्दतीने काढला असता ०.८७ ते ०.९७ पर्यंत आला. तसेच सप्रमाणात गुणांक निर्देशांक ०.५८ ते

10] I bid. P - 945.

०.९३ इतका असलेला दिसून आला. या अभ्यासाचे प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

१) गुजरात राज्यातील लहान शिशु व इयत्ता पहिलीमधील विद्यार्थ्यांच्या सामान्य क्षमतेमध्ये लिंगभेद आढळून आला नाही.

२) सामान्य क्षमता व वाचन तयारी यांच्यामध्ये धनात्मक असा सहसंबध आढळून आला.

३) विद्यार्थ्यांच्या वाचन तयारीमध्ये शहरी मुलांची वाचन तयारी अधिक असलेली दिसून आली.

४) वाचन तयारीमध्ये लहान व मोठा शिशु मध्ये लिंगभेद आढळून आला नाही.

५) वाचन तयारीच्या संपादनामध्ये बुध्दयांक आणि श्रेणीय घटक यांच्यातील आंतरक्रियाचा कोणताही परिणाम दिसून आला नाही. तसेच या संपादनावर लैंगिक घटकांचाही परिणाम झालेला दिसून आला नाही.

## २.३ समारोप

प्रा.बी.जी.बापट यांनी १९५६ मध्ये "पुणे विद्यापीठ पूर्वप्राथमिक शिक्षणातील अडचणीचा शोध घेणे व त्यापैकी कांहीवर उपाय सचविणे" या समस्यांवर संशोधन केले आहे. त्यांनी १९५६ मध्ये या शिक्षणासंबंधी ज्या काही सुधारणा झाल्या आहेत का? यासंबधी सदरहू संशोधनाचा उपयोग करून घण्यात आला आहे.

१९७० मध्ये St. Xavier's Institute of Education या संस्थेने वैदयकीय तपासणी, मधल्या सुट्टीतील आहार, शाळांची मासिक फी, पालक शिक्षक संघाची भूमिका व या शाळांमधील शिक्षिकांच्या समस्या यासंबधी अभ्यास

करण्यात आला नाही. त्यामुळे संशोधकाने आपल्या संशोधनात यासंबधीची माहिती मिळविण्यसाठी सदरहू संशोधनाचा उपयोग करुन घेतला आहे.

प्रा.देवी सी.एल. यानी केरळ राज्यातलि त्रिवेंद्रम जिल्ह्यातलि ग्रामीण व शहरी विभागातील मुलांच्या सामाजिक विकासाच्या संदर्भात संशोधन केले आहे. त्यांच्या संशोधनात शिक्षिकांची शैक्षणिक तपासणी व पालक शिक्षक सभा यासंबंधी विचार झालेला नाही. सदरहू संशोधनाचा केरळ राज्यातलि ग्रामीण व शहरी शाळा व महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण या स्तरावरील शिक्षणाच्या संदर्भात तुलनात्मक अभ्यास करण्यात सदरहू संशोधनाचा उपयोग करुन घेण्यात आला आहे. प्रा.राव एस.एस. यांनी १९८० मध्ये पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षणावर होणारा परिणाम यासंबधी संशोधन केले आहे. पूर्व - प्राथमिक शिक्षणाचा प्राथमिक व माध्यमिक शिक्षणांवर चांगला परिणाम होत असतो. यादृष्टीने या स्तरावरील मुलांचा भाषाविकास, भावनिक विकास, सामाजिक विकास व लेखन वाचन विकास या संदर्भात सदरहू संशोधनाचा उपयोग करुन घेण्यात आला आहे.

प्रा. पटेल एस.एस. यांनी पूर्वप्राथमिक शाळेतील मुलांमध्ये वाचन तयारीच्या संदर्भात सामान्य क्षमतेच्या भूमिकेच्या शोध या संबधी संशोधन केले आहे. सदरहू संशोधनाचा या स्तरावरील मुलांचा वाचन क्षमतेच्या विकास होण्यास कसा उपयोग झाला आहे. यासंबधी निष्कर्षाचा उपयोग संशोधकाने आपल्या संशोधनात करुन घेतला आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात आणि विशेषता महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर शिक्षणाच्या विविध स्तरावर जो विकास घडून आलेला आहे. त्यापैकी अंगणवाडी स्तर विशेष महत्वाचा आहे. या स्तरांवर जाणीवपूर्वक प्रयत्न केल्यास भविष्यकालीन मनुष्य बळाची आवश्यक ती निर्मिती करण्याच्या दृष्टीने शैक्षणिक क्षेत्रातील प्रत्येक घटकास मार्गदर्शन मिळू शकते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६

मध्ये या धोरणाचे सार सांगताना असे नमूद करण्यात आले आहे की शिक्षण म्हणजे भविष्यकाळातील एकमेव गुंतवणूक होय. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामधील या विचारसरणीचा अभ्यास केल्यास भविष्य काळातील सदरहू गुंतवणूक अधिक फलदायी होण्यासाठी अंगणवाडी शिक्षणाच्या अभ्यासाची नितांत आवश्यकता आहे. याकरिता सदरहू अभ्यासामध्ये यापूर्वी झालेल्या संशोधन अभ्यासाचा सर्व अभ्यास करून महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाडी शिक्षणाची वस्तुस्थिती समजून घेण्यासाठी या समस्येची निवड केलेली आहे.

या प्रकरणामध्ये संबधित साहित्याचा व संबधित संशोधनाचा अभ्यास केला आहे. ही माहिती संशोधनासाठी पार्श्वभूमी म्हणून आवश्यक होती संबंधित साहित्याचा अभ्यासामुळे अंगणवाडी शिक्षिका व विद्यार्थी यांच्या आवश्यक घटकांव्यतिरिक्त इतर ब-याच घटकांची माहिती संशोधकास मिळाली व त्यामुळे संशोधकास नवी दिशा मिळाली. संबधित संशोधनाच्या अभ्यासामुळे नमुना निवडीच्या योग्य पध्दती, तुलनात्मक आभ्यासासाठी योग्य अशा व्यक्तिच्या विद्वानांच्या मांडणी यासाठी संबंधित संशोधनाचा उपयोग झाला व सदर संशोधनामध्ये येणा-या अडचणी टाळल्या पुढील प्रकरणामध्ये संशोधन विषयाची विस्तृत माहिती दिलेली आहे.